# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०१/२०२५ (बुधवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे मौदा :- दिनांक २०/०१/२०२५ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, भंडारा ते नागपुर रोडवर माथनी टी पॉईट येथे एक निळया रंगाचा लेलॅन्ड कंपनीचा हायवा ट्रक उभा असुन त्यामध्ये अवैध्यरीत्या रेती (गौणखनिज) ची चोरी करून आणलेली आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून पोलीस स्टॉफ यांनी मौजा माथणी टी पॉईट येथे जावुन पाहणी केली असता एक निळया रंगाचा अशोका लेलॅन्ड कंपनीचा हायवा ट्रक क्र. एम.एच. ४० सी.एम ५००० हा भंडारा ते नागपूर रोडवर डाव्या बाजूस उभा मिळुन आला. सदर ट्रकमध्ये कोणीही चालक, मालक दिसुन आले नाही. सदर ट्रकची पाहणी केली असता त्यात परवाना मिळुन आला नाही. पोलीसांनी घटनास्थळावरून एक निळया रंगाचा अशोक लेलॅन्ड कंपनीचा हायवा ट्रक क्र. एम.एच. ४० सी.एम ५००० अं. कि. ४०,००,०००/रु ट्रक मध्ये १० ब्रास रेती अं.कि. ५०,०००/- रु असा एकुन कि.४०,५०,०००/- रू. चा मुदेमाल जप्त केला आहे. पाहीजे आरोपी ट्रक क्र. एम.एच ४० सी.एम ५००० चालक /मालक यांचेविरुद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२), सहकलम महाराष्ट्र जमीन महसुल अधि ४८(७) ४८(८) खाणी अणि खनिज अधि ४, २१ सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधि ३ पर्यावरण संरक्षण अधि १५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर